
# नवाकाळ शब्दकोडे-७७४



**आडवे शब्द –**

१. बिचारा ४. मूर्ख ७. आमंत्रितांना दिलेले जेवण, पार्टी १०. शरीर ११. सीमा १२. मासे पकडण्याचा हूक १३. चूक, प्रमाद १४. एक काटेरी वनस्पती, गोखरू १६. नारिंगी फुले येणाऱ्या मेथीची सुकलेली सुगंधी पाने, ही फोडणीत वापरतात १७. शैली १९. मायेचे छत्र २०. मराठी अकरावा महिना २१. अंग गळून गेलेला २४. सुसर २८. एक पालेभाजी/खाद्यतेल २९. मडक्याचा तुकडा ३०. समज ३१. चिकार ३३. ओंडक्यांचा कामचलाऊ पूल ३४. बारा वर्षे ३५. दुधाचा एक आंबट पदार्थ ३६. भरतीची वेळ ३८. अगदी गरीब माणसे ३९. फोडणीतली सुगंधी पाने ४१. रम्य ४३. चांगला, सभ्य ४६. श्वान, कुत्रा ४८. दुग्ध ५०. वृष्टी ५२. आईची वहिनी ५३. वाईट पायगुणाचा ५४. अचानक झालेली इच्छा ५५. बेचव ५६. वार्धक्य ५६७. मनाई ५८. एक चपळ प्राणी, खार ५९. गोलमाल खुलासा, मखलाशी ६३. धान्य साठवण्यासाठी भिंतीतील पोकळ जागा ६५. रदबदलीचा शब्द ६६. कुंभाराची भट्टी ६८. चिंतन ६९. विज्ञान ७०. नारळातील गर ७१. मृतदेह ७२. वस्तू, जिन्नस ७३. चंद्र, विधू ७४. सामूहिक प्रार्थनेचा प्रकार ७६. माळ, बरोबरी ७७. पौर्णिमा ७८. जाणे ८०. कर्ण ८१. व्हिटॅमिन ८३. पंजाबमधली एक प्रमुख नदी ८४. नशीबवान ८५. आसपासचा टापू ८७. चिंता ८८. उजेडाचे साधन ८९. मलई ९०. जंगली रेडा ९१. उजेड ९४. फुलांचा ताटवा ९६. या अमावास्येला चंद्रदर्शन होऊ शकते ९९. घालवणे, (अडथळा) दूर करणे १००. कवितेचा अलंकार १०२. पशू, प्राणी १०४. साडीचे वरचे टोक, शेव १०५. खिन्नता १०६. तपकिरी सालीचे विदेशी फळ १०७. तुकडा

**उभे शब्द –**

१. वाईट कृत्य, पाप २. मनात योजलेले, बेत ३. रथ हाकणारा ४. शिक्षा करणे, धडा शिकवणे ५. गडबड, धांदल ६. वेदना, एक शस्त्र ७. तोंडावरची माशीही न उडणारा, गबाळा ८. सूर्य ९. उन्हाळ्यात काही झाडांपासून मिळणारे शीतपेय ११. तह १५. ट्यूबवरील जाड आवरण १८. ऊन २०. नुकसानकारक २२. लेखी करार २३. शीतल २५. आच्छादन २६. रांगोळीसाठी या दगडाची पूड वापरतात २७. खैर, आशादायक स्थिती २८. अमानुष कृत्य ३०. प्रकट ३२. मगज ३४. निकृष्ट, कंडम ३७. आपण जन्मलो तो देश ४०. पलायन ४२. माजलेला ४४. पावसाचा ऋतू ४५. असभ्य भाषा ४६. लिहिता-वाचता येणारा ४७. ज्यू धर्मीय ४९. रक्तवाहिनी ५०. फेरा, लांबचा रस्ता ५१. समुद्राच्या पोटातील अग्नी ५२. पिछेहाट ५३. चमत्कारिक ५७. सत्तेविरुद्ध उठाव करणारा ५८. दंश ६०. रमलेला ६१. लहान ६२. गुन्ह्याचा संशय ६४. रावण ६६. दादागिरी ६७. तेजोहीन ७३. तागाची एक जात, याच्या तंतूपासून सोनेरी रंगाचा दोरखंड वळतात ७४. बेसनाचा लोकप्रिय तळलेला पदार्थ ७५. हृदयाची झडप, पडदा ७६. कस ७९. होम, यज्ञ ८०. गेरू ८२. सय, मैत्रीण ८३. रात्रीचा पाऊस ८४. सुगंधी ८५. भीती ८६. सरंजाम ८९. दर वर्षी ९१. पराक्रम, मुलांचे एक नाव ९२. महानगर, औद्योगिकृत गाव ९३. भिंती रंगवण्यासाठी वापरली जाणारी पिवळी माती ९५. नफा ९७. उचित ९८. वाचवणारा, तारणारा १०१. शाई १०३. अंकित •

**नवाकाळ कोडे क्रमांक ७७३ चे उत्तर**

**आडवे शब्द** : १. गवार ३. श्रमिक ५. झुबे ७. केचप १०. खिचडी ११. दाव १२. ढकलाढकली १५. हापूस १७. जप १८. रमणीय १९. बल २०. परज २१. गणपती २३. आकस २४. शपथ २६. नीज २८. डबर ३०. अबला ३२. वायर ३३. तीव्रता ३४. वासव ३५. टरफल ३८. तोफ ३९. कानन ४०. जाग ४२. सहारा ४५. गीतारहस्य ४८. नरद ४९. सध्या ५१. अक्कल ५३. लावण्य ५४. पडीक ५७. निज ५८. हरभरा ६१. लाखोली ६३. लतामंडप ६५. हरीण ६६. त्रयस्थ ६८. चकमक ६९. गरजवंत ७१. धुरा ७२. इकडे ७३. रमा ७४. माचिस ७७. अंबा ७९. जवळीक ८१. नरसिंहावतार ८५. पडवळ ८६. मल्ल ८८. हरण ८९. खडक ९०. सनातनी ९१. रग ९३. दावा ९४. मान ९६. यदुनाथ ९८. मदार १००. लाखी १०१. ईश्वर १०४. निकस १०५. खडतर १०६. रसभरीत १०७. वाट

**उभे शब्द** : १. गचपण २. वाडी ३. श्रवणीय ४. कढ ५. झुला ६. बेढब ७. केली ८. पहार ९. वेस १०. खिजगणतीत नसलेला ११. दाम १३. कलकलाट १४. कलश १६. पूजनीय १८. रतीब २०. पथ २२. पडता काळ २३. आब २५. पशू २७. जरब २९. रवानगी ३०. अवजार ३१. साफ ३२. वाफ ३६. रज ३७. लस ३८. तोरा ४१. गहन ४३. हाक ४४. अरण्य ४६. ताठा ४७. हक्क ४८. नवरात्र ५०. गोडी ५१. अज ५२. लहरी ५३. लाभ ५४. पलीकडे ५५. कलकत्ता ५६. अमंगल ५७. निपज ५९. रणधुमाळी ६०. स्वस्थ ६२. खोचक ६४. डर ६५. हत ६७. यथोचित ७०. वंश ७२. इमानदार ७३. रवळनाथ ७५. बहारदार ७६. भ्राता ७८. बापकमाई ७९. जवस ८०. कमनीय ८२. सिंह ८३. वणवा ८४. रखरखीत ८७. थयथयाट ९२. गमक ९५. नश्वर ९७. दुर्ग ९९. दास १००. लाड १०२. रस १०३. चोरी

# पंतप्रधान मोदींकडून होणारे नांदेड रेल्वे मार्ग उद्घाटन रद्द

वर्धा

रेल्वे मंत्रालयाने 'विशेष प्रकल्प' दर्जा दिलेल्या बहुचर्चित वर्धा- यवतमाळ - नांदेड रेल्वे मार्गाचे लोकार्पण पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते १२ जानेवारी रोजी होणार होते. मात्र हा उद्घाटन सोहळा रद्द करण्याचा निर्णय नागपूर विभागीय रेल्वे प्रशासनाने घेतला आहे. हा सोहळा वर्धा की कळंब स्थानकावर घ्यायचा यावरुन उद्धवलेल्या वादामुळे हा निर्णय घेण्यात आल्याचे बोलले जात आहे.

खासदार रामदास तडस हे उद्घाटन सोहळा वर्ध्यात घेण्याबाबत आग्रही होते. तर काही यवतमाळकर नेते कळंबसाठी हट्ट धरून बसले होते.या वादात शेवटी हा सोहळा रद्द करण्याचा निर्णय नागपूर विभागीय रेल्वे प्रशासनाने घेतला. खासदार तडस यांच्या कार्यालयानेही सोहळा रद्द झाला असल्याचे मान्य केले आहे.१२ जानेवारी रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी हे व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे हा मार्ग खुला झाल्याचे जाहीर करणार होते. थेट पंतप्रधान कार्यालयातून याबाबत मध्य रेल्वे प्रशासनाला याविषयी विचारणा झाली होती. यादिवशी खासदार तडस तसेच वर्धा व देवळी आणि यवतमाळचे आमदार उपस्थित राहू शकतात का, अशी चौकशी झाली होती. मात्र रेल्वे प्रशासन यादिवशी औपचारिक कार्यक्रम कळंब रेल्वे स्थानकावर तर खासदार वर्धा स्थानकावर कार्यक्रम घेण्याबाबत आग्रही आहे.तडस यांनी सतत पाठपुरावा केला.प्रश्न मार्गी लावला.म्हणून वर्ध्यात सोहळा व्हावा,अशी त्यांची भूमिका आहे.याबाबतचा वाद निवळेल,अशी शक्यता व्यक्त करण्यात आली होती.पण तसे झाले नाही.

# भरत गोगावलेंचाच व्हीप ठाकरे गटाच्या आमदारांनाही लागू! नार्वेकरांचे विधान

पान १ वरून- प्रतोद आणि विधिमंडळ नेत्यांची निवड करावी. त्यामुळे हा जो गैरसमज पसरवला जात आहे तो अत्यंत चुकीचा आहे. मी जो निर्णय दिला आहे तो न्यायालयाने दिलेली मार्गदर्शक तत्त्वे पाळून दिला आहे. राहुल नार्वेकर म्हणाले की, विधानसभा नियम ३ मध्ये स्पष्ट तरतूद आहे की पक्ष निवडणूक आल्यानंतर पक्षाच्या नेत्यांनी ३० दिवसांच्या आत पक्षाच्या घटनेबाबत विधानसभा अध्यक्षांना माहिती द्यावी लागते. पण या खटल्यावेळी उद्धव ठाकरे आणि एकनाथ शिंदे यांनी कळवले नव्हते. त्यामुळे निवडणूक आयोगाकडून आम्हाला याबाबतची माहिती घ्यावी लागली. निवडणूक आयोगाने दिलेल्या माहितीच्या आधारावर आम्हाला निर्णय घ्यावा लागला.



## ठाणे महानगरपालिका, ठाणे

सा. बां. विभाग

निविदा सुचना

सार्व. बांधकाम विभाग या विभागातर्फे ठाणे महानगरपालिकेच्या "आमदार स्थानिक विकास कार्यक्रम २०२२-२३ " या लेखाशिर्षका अंतर्गत ओवळा - माजिवडा मतदार संघातील ठाणे महानगरपालिका हद्दीतील प्रभाग क्र.०५ मधील येऊर ठाणे मनपा शाळा क्र. ६५ येथे व्यायामशाळेचे साहित्य खरेदी करणे अशा एक कामाकरीता ऑनलाईन निविदा मागविण्यात येत आहेत. सदर निविदा प्रक्रीयेमध्ये ज्या निविदाकारांवर शासकीय, निमशासकीय, सार्वजनिक उपक्रम, स्थानिक संस्था, महानगरपालिका ई. मार्फत नोंदणी रद्द करणेबाबत / काळ्या यादीत टाकणेबाबत कार्यवाही करण्यात आली आहे अथवा प्रस्तावीत आहे अशा निविदाकारांना निविदा भरता येणार नाही. निविदा सूचना व प्रपत्र ठाणे महानगरपालिकेचे संकेतस्थळ http://mahatenders.gov.in येथे दि.१२/०१/२०२४ ते १९/०१/२०२४ पर्यंत उपलब्ध आहे. ऑनलाईन निविदा संकेतस्थळ येथे दि.१९/०१/२०२४ रोजी पर्यंत १६.०० वाजेपर्यंत स्विकारण्यात येतील. सदर निविदा दि.२२/०१/२०२४ रोजी १६.०० वा. निविदाकार अथवा त्यांचे प्रतिनिधींसमक्ष उघडण्यात येतील.

ठामपा/पिआरओ/पिडब्ल्यूडी/११७३/२०२३-२४ सही/-
दि.११.०१.२०२४ कार्यकारी अभियंता
Pls visit our oficial web-site ठाणे महानगरपालिका, ठाणे
www.thanecity.gov.in

**उत्सवाला जबाबदारीची जोड देऊ या,
मताधिकाराने लोकशाही बळकट करु या !**



# पुण्यात चंद्रकांत पाटलांची गाडी डीएड-बीएड विद्यार्थ्यांनी अडवली

पुणे

**पुण्यातील** शिक्षण आयुक्त कार्यालयाच्या परिसरात मंत्री चंद्रकांत पाटील यांची गाडी डीएड आणि बीएडच्या विद्यार्थ्यांनी अडवली. शिक्षक भरतीमध्ये इंग्रजी माध्यमांचे स्वतंत्र आरक्षण रद्द करण्याची मागणी आंदोलक विद्यार्थ्यांनी केली. या विद्यार्थ्यांनी जोरदार घोषणा देऊन परिसर दणाणून सोडला. पुण्यातील शिक्षण आयुक्तांच्या कार्यालयाबाहेर गेल्या काही दिवसांपासून डीएड आणि बीएडचे विद्यार्थी आंदोलन करत आहेत. शिक्षण भरतीमध्ये इंग्रजी माध्यमच्या विद्यार्थ्यांचे जे स्वतंत्र आरक्षण आहे ते रद्द करण्यात यावे आणि मराठी माध्यमातील विद्यार्थ्यांना न्याय देण्यात यावा, अशी या आंदोलक विद्यार्थ्यांची प्रमुख मागणी आहे. हीच मागणी घेऊन आंदोलक विद्यार्थ्यांनी चंद्रकांत पाटील त्या परिसरात आले असता त्यांची गाडी अडवली.

आंदोलक कार्यकर्त्यांनी चंद्रकांत पाटील यांच्या गाडीला घेराव घातला. विद्यार्थ्यांनी यावेळी जोरदार घोषणाबाजी केली. चंद्रकांत पाटील यांनी या विद्यार्थ्यांशी संवाद साध्यण्याचादेखील प्रयत्न केला. मात्र विद्यार्थी आक्रमक झाले होते. त्यामुळे परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाली होती. यावेळी पोलिसांनी हस्तक्षेप करत प्रकरण निवळण्याचा प्रयत्न केला. त्यानंतर चंद्रकांत पाटील यांची गाडी पुढे सोडण्यात आली.

# सारथी, महाज्योती, बार्टी परीक्षा स्थगित

पान १ वरून

करण्यात आले होते. परीक्षेसाठी ए, बी, सी व डी अशा चार प्रश्नपत्रिका संचांची छपाई करण्यात आली होती. परंतु सी आणि डी प्रश्नपत्रिका संच वेगळ्या मुद्रणालयाकडून छपाई करून घेतले असल्याने त्यांना सील नव्हते.

मात्र विद्यापीठाने आपल्यावर करण्यात आलेले आरोप फेटाळले. विद्यापीठाने म्हटले आहे की, परीक्षा होण्यापूर्वी प्रश्नपत्रिकांची प्रत कोणत्याही व्यक्तिकडे कोणत्याही स्वरुपात उपलब्ध नव्हती किवा त्या प्रश्नपत्रिकांमधील मजकूरदेखील कोणत्याही व्यक्तिला कळालेला नव्हता. संपूर्ण परीक्षा प्रक्रियादेखील सर्व परीक्षा केंद्रांवर अत्यंत पारदर्शकपणे पार पाडण्यात आली आहे. त्यामुळे परीक्षेच्या पेपर फुटीसंदर्भात केलेले आरोप हे पूर्णतः निराधार असून त्यामध्ये कोणतेही तथ्य नाही. याबाबत परीक्षार्थींनी दिलेल्या निवेदनाचा विचार करता, विद्यापीठाने परीक्षेच्या उत्तरपत्रिकांचे मूल्यमापन स्थगित केले आहे.



**अर्ज क्र. आयएनसी-२६**
**(कंपन्यांचे (स्थापना) नियमन, २०१४ च्या नियमन ३० अन्वये)**
**कंपनीचे नोंदणीकृत कार्यालय एका राज्यामधून दुसऱ्या राज्यामध्ये बदलण्याकरिता वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध करावयाची जाहिरात.**

विभागीय संचालक, पश्चिम विभाग,
मुंबई यांच्या समक्ष
कंपनी कायदा, २०१३, कंपनी कायदा, २०१३ चे कलम १३ आणि कंपन्यांचे (स्थापना) नियमन, २०१४ च्या नियमन ३०च्या उप-नियम(५)च्या खंड(अ) च्या प्रकरणात

आणि

**मे. अनफिर्डेट सोल्युशन्स प्रायव्हेट लिमिटेड,** नोंदणीकृत कार्यालय - सदनिका क्र. ४०४, चौथा मजला, इमारत डी. क्र. ५५/६७ करण रहेजा साईनाथ नगर, खराडी, पुणे, महाराष्ट्र, भारत, ४११०१४ याचिकाकर्ता यांच्या प्रकरणात

सर्वसाधारण जनतेस याद्वारे सूचना देण्यात येते की, कंपनी त्यांचे नोंदणीकृत कार्यालय महाराष्ट्र राज्य येथून "आंध्र प्रदेश राज्य" येथे बदलण्यास कंपनीस सक्षम करण्याकरिता दि. ०८ जानेवारी, २०२४ रोजी घेण्यात आलेल्या विशेष सर्वसाधारण सभेमध्ये मंजूर करण्यात आलेल्या विशेष ठरावाच्या दृष्टीने कंपनीच्या मेमोरॅण्डम ऑफ असोसिएशन मधील बदलास मंजुरी मिळविण्याकरिता, कंपनी कायदा, २०१३ च्या कलम १३ अन्वये केंद्र सरकारकडे अर्ज करण्याचे कंपनी प्रस्तावित आहे.

कोणी व्यक्ती, ज्यांचे हितसंबंध कंपनीच्या नोंदणीकृत कार्यालयाच्या प्रस्तावित बदलामुळे बाधित होत असल्यास त्यांनी एकतर एमसीए-२१ पोर्टल (www.mca.gov.in) येथे गुंतवणूकदार तक्रार अर्ज भरून किंवा त्याचे/तिचे आक्षेप, त्याच्या/तिच्या हितसंबंधाचे स्वरुप आणि विरोधाची कारणे नमूद केलेल्या प्रतिज्ञापत्रासह विभागीय संचालक, पश्चिम विभाग, एव्हरेस्ट, ५ वा मजला, १०० मरीन ड्राईव्ह, मुंबई - ४००००२, महाराष्ट्र यांना सदर सूचना प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून चौदा दिवसांच्या आत स्वत: किंवा इतर कोणामार्फत पोहोचवावे किंवा नोंदणीकृत टपालाद्वारे पाठवावे व त्याची प्रत अर्जदार कंपनीस त्यांच्या खाली नमूद केलेल्या पत्त्यावर पाठवावी:

**अनफिर्डेट सोल्युशन्स प्रायव्हेट लिमिटेड,**
सदनिका क्र. ४०४, चौथा मजला, इमारत डीएस. क्र. ५५/६७ करण रहेजा साईनाथ नगर, खराडी, पुणे, महाराष्ट्र, भारत, ४११०१४

**याचिकाकर्ता यांच्याकरिता आणि वतीने**
**अनफिर्डेट सोल्युशन्स प्रायव्हेट लिमिटेड करिता**
**वेंकटा सुब्बा राव कोवथा**
**संचालक (डीआयएन: ०७३१८७२७)**

**दिनांक: ११.०१.२०२४**
**ठिकाण: पुणे**



# नाशिकच्या काळाराम मंदिरात आज पंतप्रधान मोदींच्या हस्ते पूजा होणार

पान १ वरून

या मंदिराला भेट दिली होती.

दरम्यान, पंतप्रधान नरेंद्र मोदी औरंगाबादरोड हायवेवर रोड शोदेखील करणार आहेत. मुंबईत बोरिवली-ठाणे भूमिगत मार्ग, पश्चिम रेल्वेची सहावी मार्गिका, सीवूडस-बेलापूर-उरण उपनगरीय रेल्वेची चौथी मार्गिका, बेलापूर-पेंधर नवी मुंबई मेट्रो- १ आणि ठाणे-वाशी ट्रान्सहार्बर मार्गावरील दिघा रेल्वे स्थानक या प्रकल्पांचे मोदी उद्घाटन करणार आहेत, तर मरिन ड्राईव्ह ऑरेंज गेट साडेसहा किमीच्या बोगद्याचे भूमिपूजन पंतप्रधान मोदींच्या हस्ते उद्या होणार आहे. त्यासोबत मोदी शिवडी-न्हावा शेवा अटल सेतूचे लोकार्पण करणार आहेत. या कार्यक्रमासाठी मोठा पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आलेलो आहे.

# महाराष्ट्र देशातील सर्वात स्वच्छ राज्य

पान १ वरून

असलेल्या शहरांच्या श्रेणीत महाराष्ट्रातील सासवड या शहराने पहिला क्रमांक पटकावला. छत्तीसगडमधील पाटण दुसऱ्या स्थानी तर महाराष्ट्रातील लोणावळा तिसऱ्या स्थानी आहे. गंगेच्या किनारी भागांत असलेल्या स्वच्छ शहरांच्या श्रेणीत वाराणसी प्रथम स्थानी असून प्रयागराज दुसऱ्या स्थानी आहे.दिल्लीतील भारत मंडपम कन्व्हेन्शन सेंटरमध्ये आयोजित कार्यक्रमात राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आणि केंद्रीय शहरविकास मंत्री हरदीप पुरी यांनी स्वच्छ सर्वेक्षणात बाजी मारलेल्या राज्यांच्या प्रतिनिधींचा गौरव केला.

मध्य प्रदेशमधील महूला सर्वात स्वच्छ कॅन्टोनमेंट बोर्डाचा पुरस्कार मिळाला आहे.तर सर्वोत्कृष्ट सफाई मित्र सेफ सिटी पुरस्कार चंदीगडला देण्यात आला. स्वच्छ भारत सर्वेक्षणात २०१६ मध्ये फक्त ७३ शहरे होती. तेव्हाही इंदूर हे शहर पहिल्या क्रमांकावर होते.

आता या स्पर्धेत ४ हजार ३५५ शहरांचा समावेश होता. तरीही इंदूरनेच पहिल्या क्रमांक पटकावला आहे. स्वच्छ सर्वेक्षण - २०२० मध्ये मध्य प्रदेशला एकूण २७ पुरस्कार मिळाले होते. यामध्ये १८ शहरे स्टार रेटींगसाठी आणि ९ शहरे स्वच्छ सर्वेक्षणासाठी होती.

# सदानंद कदमांना हायकोर्टाचा दिलासा

पान १ वरून

तो सकृतदर्शनी धक्कादायक आहे, अशी टिप्पणीही न्यायमूर्ती मिलिंद जाधव यांच्या एकल खंडपीठाने कासल उपरोक्त आदेश देताना केली. या प्रकरणी सादर करण्यात आलेली तथ्ये खूपच ठोस' आणि गंभीर आहेत. त्यामुळे, कोणत्याही पक्षकाराने कायदेशीर व्यवस्थेचा गैरफायदा घेऊ नये यासाठी या प्रकरणी न्यायालयाचा हस्तक्षेप गरजेचा असल्याचे नमूद करून न्यायमूर्ती जाधव यांनी कदम यांच्या रिसॉर्टचे बांधकाम पाडण्याच्या नोटिशीला अंतरिम स्थगिती दिली. संबंधित अधिकाऱ्यांनी याचिकाकर्त्यांच्या रिसॉर्टविरुद्ध कोणतीही कठोर कारवाई करू नये. तसेच, अपीलीय प्राधिकरणाने कदम यांच्या अपिलावर पुढील आदेश येईपर्यंत कोणतीही सुनावणी घेऊ नये, असे आदेशही न्यायालयाने दिले.



**फॉर्म ए**
**जाहीर उद्घोषणा**
(भारतीय नादारी आणि दिवाळखोरीपणा मंडळ (कॉर्पोरेट व्यक्तींकरिता दिवाळखोरी ठराव प्रक्रिया) विनियमन, २०१६ च्या विनियमन ६ अन्वये)

**निओ कॅप्रिकॉर्न प्लाझा प्रायव्हेट लिमिटेडच्या धनकोंचे लक्ष वेधण्याकरिता**

**संबंधित तपशील**

| | | |
|---|---|---|
| १. | कॉर्पोरेट कर्जदाराचे नाव | निओ कॅप्रिकॉर्न प्लाझा प्रायव्हेट लिमिटेड |
| २. | कॉर्पोरेट कर्जदाराच्या स्थापनेचा दिनांक | १२ जानेवारी, २००४ |
| ३. | प्राधिकरण ज्या अंतर्गत कॉर्पोरेट कर्जदाराची स्थापना/नोंदणीकरण झाले | कंपनी निबंधक, मुंबई |
| ४. | कॉर्पोरेट कर्जदाराचा कॉर्पोरेट ओळख क्र./ मर्यादित दायित्व ओळख क्र. | U55102MH2004PTC187649 |
| ५. | कॉर्पोरेट कर्जदाराच्या नोंदणीकृत कार्यालयाचा आणि प्रमुख कार्यालयाचा (जर असल्यास) पत्ता | रहेजा चेंबर्स, ४ था मजला, लिंकिंग रोड, आणि मेन अॅव्हेन्यू, सांताक्रुझ - पश्चिम, मुंबई, महाराष्ट्र, भारत ४०००५४. |
| ६. | कॉर्पोरेट कर्जदाराच्या संदर्भात दिवाळखोरी सुरू होण्याचा दिनांक | ०९ जानेवारी, २०२४ |
| ७. | दिवाळखोरी ठराव प्रक्रिया परिसमाप्तीचा अंदाजित दिनांक | ०७ जुलै, २०२४ |
| ८. | अंतरिम ठराव व्यावसायिक म्हणून काम पाहणाऱ्या दिवाळखोरी व्यावसायिकाचे नाव आणि नोंदणीकरण क्रमांक | नाव: जयेश नटवरलाल संघराजका<br>नोंदणी क्रमांक:<br>IBBI/IPA-001/IP-P00216/2017-2018/10416 |
| ९. | मंडळाकडे नोंदणीकृत असल्यानुसार, अंतरिम ठराव व्यावसायिकाचा पत्ता आणि ईमेल | **नोंदणीकृत पत्ता:**<br>४०५-४०७, हिंद राजस्थान बिल्डींग, डी.एस.फाळके रोड, दादर पूर्व, मुंबई ४०००१४.<br>**ईमेल आयडी:** jayesh.sanghrajka@incorpadvisory.in |
| १०. | अंतरिम ठराव व्यावसायिकासह पत्रव्यवहाराकरिता वापरावयाचा पत्ता आणि ईमेल | **पत्रव्यवहाराचा पत्ता:**<br>**इनकॉर्प रिस्ट्रक्चरिंग सर्व्हिसेस एलएलपी**<br>४०५-४०७, हिंद राजस्थान बिल्डींग, डी.एस.फाळके रोड, दादर पूर्व, मुंबई ४०००१४.<br>**पत्रव्यवहाराचा ईमेल आयडी:**<br>cirp.neocapricorn@gmail.com |
| ११. | दावे सादर करण्याचा अंतिम दिनांक | २३ जानेवारी, २०२४ |
| १२. | अंतरिम ठराव व्यावसायिकाद्वारे निश्चित केल्यानुसार, कलम २१ च्या उप-कलम (६ए)च्या खंड (ब) अन्वये कर्जदारांचे वर्ग, जर असल्यास. | लागू नाही |
| १३. | वर्गामधील धनकोंचे प्राधिकृत प्रतिनिधी म्हणून काम करण्याकरिता ठरविण्यात आलेल्या दिवाळखोरी व्यावसायिकांची नावे (प्रत्येक वर्गातील तीन नावे) | लागू नाही |
| १४. | (अ) संबंधित अर्ज आणि<br>(ब) अधिकृत प्रतिनिधींचा तपशील उपलब्ध असेल: | (अ) दावा अर्ज डाऊनलोड करण्याकरिता वेब लिंक: www.ibbi.gov.in/downloadform.html<br>(ब) लागू नाही |

याद्वारे सूचना देण्यात येते की, **राष्ट्रीय कंपनी कायदा न्यायाधिकरण, मुंबई खंडपीठ,** यांनी **आदेश क्र. सी. पी.(आयबी) क्र. २१०/एमबी/२०२३ दिनांक ०९ जानेवारी, २०२४** नुसार **निओ कॅप्रिकॉर्न प्लाझा प्रायव्हेट लिमिटेड**ची कॉर्पोरेट दिवाळखोरी ठराव प्रक्रिया सुरू करण्याचे आदेश **दि. ०९ जानेवारी, २०२४** रोजी दिले आहेत. **निओ कॅप्रिकॉर्न प्लाझा प्रायव्हेट लिमिटेड**च्या धनकोंना याद्वारे त्यांचे दावे पुराव्यासह **दि. २३ जानेवारी, २०२४** रोजी किंवा त्यापूर्वी अंतरिम ठराव व्यावसायिक यांच्याकडे नोंद क्र. १० समोर नमूद पत्त्यावर सादर करण्यास सांगण्यात येत आहे.

वित्तीय धनको यांनी दाव्याबाबतचे त्यांचे पुराव्यासहीत दावे फक्त इलेक्ट्रॉनिक पद्धतीने सादर करावे. इतर सर्व धनको त्यांचे दाव्याबाबतचे पुरावे व्यक्तिशः, टपालाद्वारे किंवा इलेक्ट्रॉनिक पद्धतीने सादर करू शकतात.

**दाव्याबाबतचे चुकीचे किंवा दिशाभूल करणारे दावे सादर केल्यास दंड ठोठावण्यात येईल.**

**जयेश नटवरलाल संघराजका**
**निओ कॅप्रिकॉर्न प्लाझा प्रायव्हेट लिमिटेडच्या प्रकरणात**
**अंतरिम ठराव व्यावसायिक**

**दिनांक:** १२ जानेवारी, २०२४
**ठिकाण:** मुंबई

नोंदणीकरण क्रमांक: IBBI/IPA-001/IP-P00216/2017-2018/10416
एएफए क्र. AA1/10416/02/250924/106031 वैधता दि. २५ सप्टेंबर, २०२४ पर्यंत

**जाहीर सूचना**

आम्ही आमच्या अशिलाच्या वतीने **शांती सदन को-ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटी,** (यापश्चात **"मालक"** असे उल्लेखित), को-ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटी कायदा १९६० अन्वये योग्यरित्या नोंदणीकृत, नोंदणीकरण क्र. बीओएम/एचएसजी/केडब्ल्यू/७२६०/१९८२, नोंदणीकृत पत्ता - दादाभाई रोड, विलेपार्ले पश्चिम, मुंबई - ४०००५६ यांच्या निम्नलिखित अनुसूचीमध्ये वर्णन केलेल्या स्थावर मालमत्तेकरिता शीर्षकाची तपासणी करीत आहोत.

स्वतंत्र व्यक्ती, भागीदार, कोणत्याही भागीदाराचे कायदेशीर वारस, हिंदू अविभक्त कुटुंब, कंपनी, बँका, वित्तीय संस्था, नॉन-बँकिंग वित्तीय संस्था, फर्म, व्यक्तींची संघटना किंवा स्थापित असलेले अथवा नसलेले स्वतंत्र व्यक्तींचे मंडळ, सावकार आणि/किंवा धनको समाविष्ट असलेल्या कोणाही व्यक्तींचा अनुसूचीमध्ये वर्णन केलेल्या मालमत्तेवर किंवा तिच्या कोणत्याही भाग किंवा तुकड्यावर विक्री, अदलाबदल, नियुक्ती, भेट, मृत्युपत्र, भाडेपट्टी, उप-भाडेपट्टी, भाडेकरू, पोट-भाडेकरू, लिव्ह अॅण्ड लायसन्स, परवाना, करार, गहाणवट, बोजा, धारणाधिकार, प्रभार, न्यास, वारसा, उत्तराधिकार, करारपत्र, कंत्राट, सामंजस्य करार, वहिवाट, मार्गाचा अधिकार, भोगवटा, ताबा, कौटुंबिक व्यवस्था, तडजोड, देखभाल, शीर्षकाचे हस्तांतरण, कोणत्याही न्यासाअंतर्गत कोणताही लाभार्थी अधिकार कोणत्याही कराराअंतर्गत वहिवाट किंवा सर्वप्रथम खरेदीचा अधिकार, किंवा अन्य कोणतीही व्यवस्था, कायद्याच्या कोणत्याही न्यायालयाचा हुकूम किंवा आदेश, प्रलंबित कायदेशीर कारवाई, जप्ती, कोणतेही बक्षिस, आरक्षण, विकास अधिकार, एफएसआय वापर, किंवा कोणतेही दायित्व किंवा वचनबद्धता किंवा कोणत्याही स्वरुपाची मागणी या मार्गे किंवा अन्य कशाही प्रकारे कोणताही आक्षेप, दावा, हक्क, शीर्षक, हिस्सा आणि/किंवा हितसंबंध असल्यास त्यांनी त्याबाबत सहाय्यक मूळ कागदपत्रांसह लेखी स्वरुपात निम्नस्वाक्षरीकारांना सदर प्रसिद्धीच्या दिनांकापासून १४ (चौदा) दिवसांच्या कालावधीमध्ये सूचित करणे आवश्यक आहे, असे न केल्यास, असे मानण्यात येईल की, यावरील दावा केलेल्या आणि मालकाद्वारे वरील उल्लेखिलेल्या सदर मालमत्तेमध्ये कोणाचाही कोणताही हक्क, शीर्षक किंवा हितसंबंध नाही आणि अशा व्यक्ती/क्तींचा दावा सोडून दिला आणि/किंवा गुंडाळून ठेवला असे समजण्यात येईल आणि आमच्या अशिलावर बंधनकारक असणार नाही.

**वरील सदर मालमत्तेची अनुसूची**

मुंबई शहर आणि मुंबई उपनगरच्या नोंदणीकरण जिल्हा आणि उप-जिल्ह्यामधील मुंबई उपनगर जिल्ह्यामधील दादाभाई रोड, विलेपार्ले (पश्चिम), मुंबई ४०० ०५६ येथे स्थित विलेपार्ले पश्चिम, गाव: विलेपार्ले पश्चिम, तालुका: अंधेरीच्या टी.पी.एस. VI चा सीटीएस क्र. ८४९, ८४९/१ ते ४, अंतिम प्लॉट (एफ.पी. क्र.) ५० धारण केलेल्या मोजमाप ५६८.६७ चौ.मी. किंवा साधारण तेवढ्याच जमिनीवर स्थित, असलेल्या आणि वसलेल्या, त्यावरील एकूण १२ (बारा) निवासी सदनिका आणि २ गॅरेज समाविष्ट असलेल्या तळमजला अधिक वरील ४ (चार) आणि अर्धा मजले समाविष्ट असलेली "शांती सदन" सी.एच.एस. लि. या इमारतीसह जमीन किंवा मैदानाचे सर्व खंड आणि तुकडे. सदर जमिनीच्या चतु:सीमा खालीलप्रमाणे:

पूर्वेस किंवा त्या दिशेने : प्लॉट क्र. ५१ (राम निवास) द्वारे
पश्चिमेस किंवा त्या दिशेने : स्कीम रोडद्वारे
उत्तरेस किंवा त्या दिशेने : प्लॉट क्र. ५०-१ (जस व्हिला) द्वारे
दक्षिणेस किंवा त्या दिशेने : दादाभाई रोडद्वारे

दिनांक १२ जानेवारी, २०२४

**लक्ष्यवेधी लीगल करिता**
कार्यालय क्र. ७, झैतून अपार्टमेन्ट, स्टेशन रोड,
गोरेगाव (पश्चिम), मुंबई ४०० १०४.